# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट १२-२३ दिनांक १२/०१/२०२३

## दुचाकी वाहने चोरी करणाऱ्या राजस्थान राज्यातील सराईत आरोपीतांना अटक करुन मुद्देमाल जप्त - पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत राहणारे फिर्यादी नामे श्री. संतोषकुमार घनश्यामदास केशरवाणी, वय-४३ वर्षे, रा. वाकणपाडा, नालासोपारा(पु.),ता.वसई, जि. पालघर यांनी त्यांच्या ताब्यातील होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोटर सायकल क्रं. एम.एच.४८. बी.ए.६६१० ही दिनांक ०३/०१/२०२३ रोजी सकाळी ०७.१५वा. ते सकाळी ०९.०० वा.चे दरम्यान सिताराम अपार्टमेंट, वाकनपाडा येथील मोकळया जागेत नालासोपारा (पु.), ता.वसई, जि.पालघर येथे पार्क केली होती. सदर मोटर सायकल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी केलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीताविरुध्द दिनांक ०४/०१/२०२३ रोजी पेल्हार पोलीस ठाणेत गु.रजि.नं. २१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी वरिष्ठांच्या मागदर्शनाखाली तांत्रिक तपास व गुप्त बातमीदारांचेमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे राजस्थान राज्यातील सराईत आरोपीत नामे १) अनिलकुमार सुरजनलाल बिष्णोई, वय-२३ वर्षे, २) रामाराम मोबताराम सुतार, वय-२४ वर्षे, दोन्ही रा. कामण, ता.वसई, जि.पालघर यांस दिनांक ०५/०१/२०२३ रोजी ताब्यात घेवुन विचारपुस केली असता तपासादरम्यान त्यांनी वर नमुद गुन्हातील ॲक्टीवा चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास वर नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. तपासादरम्यान आरोपी यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी आणखी ०३ गुन्हयातील ०१ ॲक्टीव्हा व ०२ युनिकॉर्न मोटार सायकल चोरी केल्याचे सांगितल्याने गुन्हयातील मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद आरोपीत यांचेकडून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार | गु.रजि.नं. I २१/२०२३, भा.दं.वि.सं.कलम-३७९,३४ प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | पेल्हार | गु.रजि.नं. I ९८२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |
| ३ | पेल्हार | गु.रजि.नं. I ८८२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम-३७९ प्रमाणे |
| ४ | शांतीनगर, ठाणे शहर | गु.रजि.नं. I ७७९/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९, प्रमाणे |

नमुद सराईत आरोपीत नामे. १) अनिलकुमार सुरजनलाल बिष्णोई याचेवर जिल्हा जालोर, राज्य-राजस्थान येथील पोलीस ठाण्यांमध्ये विविध कलमांखाली ०४ गुन्हे दाखल असुन आरोपीत नामे २) रामाराम मोबताराम सुतार याचेवर राजस्थान राज्यातील वेगवेगळया जिल्हयातील पोलीस ठाण्यांमध्ये विविध कलमांखाली ०७ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी केली आहे.



---ooo---